NAVJYOT / Vol. XII / Issue – III ISSN 2277-8063

# संशोधन आराखडा :अर्थ,आवश्कता व वैशिष्टये

तिलकचंद पी.शेंडे,राज्यशास्त्र विभाग नागपूर

**प्रस्तावना :—**

सामाजिक संशोधनात व अर्थशास्त्रीय संशोधनात संशोधन आराखडयास विशेष महत्व आहे. कारण त्या आधारावर प्रस्तावित विषय,विषयाची व्याप्ती, विषयाच्या माहिती संकलनाबददल अधिक माहिती मिळते.

सामाजिक संशोधनातील व अर्थशास्त्रीय संशोधनातील संशोधन आराखडा ही प्रमुख पायरी आहे. संशोधकाला आपल्या संशोधनात पध्दतशीर नियोजन करावे लागते. त्याची रूपरेखा वा आराखडा ठरवावी लागते. संशोधन मांडणीचे स्वरूप निश्चित व स्पष्ट करावे लागतात. त्यालाच संशोधनाचा आराखडा म्हणतात.कोणतेही धरण वा इमारत बांधतानी जसा आराखडा तयार केला जातो.संशोधकाला संशोधन आराखडा तयार करताना त्यामध्ये संशोधनाचा विषय, अध्ययन,उददेश,कालावधी,नमुना,निवड,क्षेत्र ठरवावे लागते.तथ्य संकलनाची पध्दती संशोधन कर्त्याचा तपशील ठरविणे या सर्व प्रक्रियेस संशोधनाचा आराखडा म्हणता येइल.

**संशोधन आराखडयाचा अर्थ:—**

संशोधन आराखडा म्हणजे सामाजिक संशोधन तंत्राचा एक प्रकार असुन सामाजिक समस्येची पुर्तता करण्याचे ते साधन आहे. त्याकरिता योग्य त्या माहितीची निवड करणे आणि संकलन करणे महत्वाचे आहे.करिता योग्य व्यक्ती,पध्दती,तंत्र,प्रकार आणि संशोधक यांची आवश्कता असते.

संशोधन आराखडयाची विविध सामाजिक संशोधकांनी केलेल्या व्याख्या पुढिल प्रमाणे आहेत.प्रा.यंग —च्या मते' सर्वसामान्य शास्त्रीय प्रारूपामधील विविध संशोधनात्मक प्रक्रियेवर कलेच्या नियंत्रणातुन संशोधन आराखडा निर्माण होते.'

प्रा.मिलर—च्या मते 'डिझाइन रिर्सच या पुस्तकामध्ये संशोधन पुर्ण करताना त्यातील सर्व प्रक्रियाचे नियोजित सुसूत्रीकरण म्हणजे संशोधन आराखडा होय.'

प्रा.जनरल डेल च्या मते,चौकशीचे नियोजन आणि व्यूहरचना अशा पध्दतीने असते की त्यातून संशोधनात्मक समस्येवर उत्तरेही मिळू शकते.

या विविध प्रकारच्या व्याख्याच्या आधारे संशोधन आराखडयात पुढिल प्रश्नाचा समावेश होते

१.अभ्यासाचा विषय कोणता आहे
२.संशोधन का केले जाते.
३.संशोधन कोठे केले जाते.
४.माहिती संकलनाचा कोणता प्रकार वापरत आहे.
५.ते कोठून मिळवाता येते.
६ त्या साठि किती कालावधी लागते.
७.माहिती संकलन तंत्र कोणती असतात.
८.माहितीचे विश्लेषण कसे असते.
९.नमुना निवड आराखडा कसा असते.
१०.संशोधन अहवाल कोणत्या प्रकारे तयार केले जाइल.

थोडक्यात संशोधन आराखडयात पुढिल बाबी महत्वाच्या आहेत.

अ.संशोधन समस्या विधान स्पष्ट शब्दात असावे.
ब.संशोधनासाठि निवड केलेल्या विशिष्ट गटाची संख्या अभ्यासावी.
क.त्यामधुन योग्य प्रतिनिधीक स्वरूपाच्या संख्याची निवड करावी.
ड.प्रक्रिया व तंत्र याचा माहिती संकलना करिता वापर करावा.
इ.संकलित माहितीचे विश्लेषण व त्यावरिल प्रक्रिया संशोधनात्मक पध्दतीचा वापर केली असली पाहीजे.

**संशोधन आराखडयाची आवश्कता:—**

सामाजिक शास्त्रात व विशेषता अर्थशास्त्रात संशोधन आराखडयाचे महत्व विविध स्वरूपाचे आहे. त्याची कारणमीमांसा पुढिलप्रमाणे अ)संशोधन आराखडयाच्यामुळे विविध समस्याचे निराकरण कमी वेळात परिणामत्क व सुलभ होउ शकते.त्यामुळे कमीत कमी श्रम,पैशा व वेळ जास्तीत जास्त माहीती संकलित होउ शकते.

ब) त्याकरिता आगामी योजना करणे गरजेचे व आवश्यक असते.त्या योजनेत माहिती संकलन आणि माहितीचे विश्लेषण,संशोधनातील उदिष्टये लक्षात घेउन उपलब्ध मनुष्यबळ,पैसा व वेळेत ते काम कसे करून घ्यावे याचे मार्गदर्शन घ्यायवयाचे.
क)संशोधन प्रकल्प संशोधन आराखडयावर आधारित असते.
ड)नियोजित अभ्यासाचे टिकात्मक परिक्षण करण्यास संशोधन आराखडयाचा उपयोग होते.
इ)संशोधकाच्या विविध कल्पनाना संशोधन आराखडयामुळे संशोधनात पुर्णरूप देता येते.

**संशोधन आराखडयातील घटक :—**

संशोधन आराखडा तयार करताना संशोधकाने पुढिल घटकाचा विचार केला पाहिजे.
१.समस्येचे कार्यक्षेत्र निश्चित असावे आपले संशोधन कशा संबधी आहे त्यासाठि कोणती माहिती आवश्यक आहे हे संशोधकाने ठरवावे.
२.संशोधनासाठि निवडलेल्या विषयात संशोधन कसे महत्वाचे आहे ते संशोधकास स्पष्ट करावे लागते. त्यासाठि संशोधनाचे उदिष्टय निश्चित करावी लागतात.
३.माहिती संकलित करण्यासाठि कोणती पध्दत वापरणार याचा स्पष्टीकरण संशोधकाने दिले पाहिजे. संशोधनाकरिता माहिती मिळवताना किती व कोणती मुलाखत घ्यायच्या ,मुलाखती देणायाची निवड कशा पध्दतीने करायची याची नोंद संशोधन आराखडयात असली पाहिजे.
४.संशोधनात नमुना निवड पध्दती महत्वाची असते.एकादया उदयोगातील कामगाराच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अभ्यास करताना कोणत्या कारखाना निवडाचा याचा एकुण कामगार किती,त्यापैकी मुलाखती साठि किती कामगार निवडायचे हे ठरवावे लागेल.

**उत्कुष्ट संशोधनाची आराखडाची वैशिष्टये:—**

उत्कुष्ट संशोधनाची आराखडयाची वैशिष्टय विचारात घेताना त्यातील उदिष्टये,सत्यता,विश्वसनियतता व सामान्यीकरण यावर भर दिला जाते. सर्वसाधारणपणे आराखडयातील कमीत कमी पुर्वग्रह दूष्टीकोण असते. माहितीसंकलन व विश्लेषण अधिक विश्वसनिय स्वरूपाचे असते.

या आराखडयामध्ये किमान अनुभवजन्य चुक राहते.तो सर्वोत्तम आराखडा ठरतो.त्याचप्रमाणे या आराखडयामुळे अधिकाधिक माहिती मिळते व समस्येचे निराकरण करण्यासाठि वापरल्या जाणाया विविध बाजुच्या अभ्यास करण्याची संधी मिळते संशोधन आराखडयात विशिष्ट सामाजिक वा आर्थिक समस्येचा विचार केला जातो.त्यावेळी पुढिल बाबीचा विचार केला जाते.
१.माहिती संकलनाची साधने
२.संशोधक व सहकारी याची उपलब्धता
३.कौशल्य अभ्यासाच्या समस्येची उदिष्टये
४.अभ्यासावयाच्या समस्येचे उदिष्टये
५.संशोधकाकडे उपलब्ध असलेला पैसा व वेळ

प्रत्येक प्रारूपामध्ये बलस्थाने व कमकुवत स्थान असते.चांगल्या प्रकारचा संशोधन आराखडा चार प्रकारच्या घटकावर अवलंबुन असते.विश्वसनियता,उदिष्टये, सामान्यीकरण,सत्यता वर आधारित असते.

**अ.उदिष्टये :**

सामाजिकशास्त्रातील संशोधनात विशेषता राज्यशास्त्र,समाजशास्त्र व अर्थशास्त्र यात उदिष्टाना अधिक महत्व आहे.प्रत्येक संशोधन विशिष्ट हेतुने केले असते म्हणजे उदिष्ट होय.संशोधनात संशोधक कित्येक वेळा साचेबंद प्रश्नावली वापरतो त्यात बहुविध उत्तर असणारा प्रश्न असते.आणि प्रतिक्रिया देणाया व्यक्तीला त्या उत्तरामधील एक उततर निवडावा लागतो.

**ब.विश्वसनियता:—**

याचा अर्थ उत्तरकर्त्याच्या उत्तरामध्ये सातत्य असावे जर संशोधकाने लोकसंख्या समस्या अभ्यासावयास घेतली आणि त्या लोकसंख्या वाढिची कारणे शोधण्यासाठि प्रश्न विचारला व प्रत्युत्तर देणारे तेच उत्तर दिले तर त्यात विश्वसनियता असते. या उलट उत्तर देणायानी आपली उत्तरे त्याच प्रश्नासाठि वेगवेगळया प्रकारे दिली तर संशोधकाचा गोंधळ होतो.त्यातुन विश्वसनियता आढळून येत नाही म्हणून संशोधकाने प्रश्न विचारताना त्याची उत्तरे देणारे एक ठराविक पध्दतीने प्रतिक्रिया देतील याची खात्री करून घ्यावी.

**सामान्यीकरण :—**

संशोधनातील निष्कर्ष समाजातील मोठया गटाना लागू झाला पाहिजे जेव्हा संशोधक माहिती संकलन करतो त्याची प्रक्रिया करतो,तेव्हा निघणारे निष्कर्ष निवडक गटापुरते असले तरीही त्या मोठया गटाना लागू पडणारे असले पाहिजेत.

**सत्यता :—**

ज्या साधनाचा वापर आपण करणार आहोत त्यातुन सत्यता निष्पन होते.उदा.बौध्दीक चाचणी वापरून बुध्दयांक मोजता येते.

**संशोधन आराखडयाची उदिष्टये :—**

१.कोणकोणत्या संशोधन पध्दतीचा उपयोग करणारे शक्य आहे.त्याचे स्पष्टीकरण दयावे.
२.सामाजिकदृष्टया महत्वाच्या असणाया समस्येकडे संशोधकाचे लक्ष वेधणे.
३.संशोधन कार्य विश्वसनियतेने सुरू करता यावे म्हणून सहायय करणे.
४.तत्कालिन स्थितीच्या संदर्भात पुर्वनिर्धारित गृहित कृत्याचे परिक्षण करणे.

वरिल विश्लेषणावरून संशोधन आराखडयाचे महत्व प्राप्त होते.

**संदर्भ :—**

१.पाटिल वा.भा.संशोधन पध्दती,प्रशांत पब्लिकेशनस,पुणे
२.डॉ.नाड गोंडे,गुरूनाथ,सामाजिक संशोधन,फडके प्रकाशन,कोल्हापुर,ऑक्टोबर १९९९
३.डॉ.आगलावे प्रदिप,संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे,विदया प्रकाशन,नागपूर
४.कोठारी सी.आर.संशोधन पध्दतीशास्त्र,पध्दती व तंत्रे,न्यु एज इंटरनॅशनल,न्यु दिल्ली.